CR202105200१



**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र.संकिर्ण-२०१८/प्र.क्र.१३/ मातंक, दिनांक २२/०२/२०१९.

२. महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग यांचेकडील शासन परिपत्रक क्र.गाजप्र.-२०१९/प्र.क्र.१३६/ पंरा-४,दिनांक २१/०१/२०२०

३. जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख, (म.राज्य), पुणे यांचेकडील परिपत्रक क्र.नागरी भूमापन-३/ सनद फी आकारणी /प्र.क्र.१३८/२० दिनांक :- १२/११/२०२०

४. जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख, (म.राज्य), पुणे यांचेकडील परिपत्रक क्र.गावठाण/ड्रोन सर्व्हे/SOP/प्र.क्र. १४२/२०२० दिनांक :- २३/११/२०२०

---

**परिपत्रक**

क्र.गावठाण/ड्रोन सर्व्हे/SOP/प्र.क्र.१३०/२०२१
जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि
अभिलेख, (म.राज्य), पुणे यांचे कार्यालय
पुणे, दिनांक :- २०/०५/२०२१

**विषय: ड्रोनद्वारे गावठाण भूमापन झालेल्या गावांच्या सनद छपाई बाबत.**

**प्रस्तावना-**

राज्यातील सर्व गावांच्या गावठाणामधील जमिनींचे GIS आधारीत सर्वेक्षण व भूमापन करणेबाबतचा गावठाण जमाबंदी प्रकल्प ग्रामविकास विभाग, जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमी अभिलेख महाराष्ट्र राज्य व भारतीय सर्वेक्षण विभाग, भारत सरकार यांच्या संयुक्त सहभागाने राबविण्यास उपरोक्त वाचा सदरी नमुद क्र.१ चे शासन निर्णयान्वये मान्यता देणेत आली आहे. या प्रकल्पाअंतर्गत गावठाण भूमापन न झालेल्या (महानगर पालिका, नगरपालिका, नगरपरिषद क्षेत्र वगळता) सर्व गावांचे गावठाण भूमापन करुन मिळकत पत्रिका स्वरूपात अधिकार अभिलेख व गावातील मालमत्तांचे GIS प्रणालीवर आधारीत मालमत्ता पत्रक तयार करण्यात येणार आहे. महाराष्ट्र राज्याचे योजनेच्या आधारावर, केंद्र शासनाने गावामधील रहिवासासाठी मिळकतीचे स्वामित्व अधिकार देणेसाठी "स्वामित्व योजना" संपूर्ण देशामध्ये सुरू केली आहे. गावठाण भूमापन प्रकल्प राबविण्याबाबत ग्राम विकास विभागाकडील शासन परिपत्रक क्र.गाजप्र-२०१९/प्र.क्र.१३६/पंरा,दि.२१/१/२०२० अन्वये मार्गदर्शक सुचना देण्यात आलेले आहेत. ड्रोनद्वारे गावठाण भूमापन झालेल्या गावाचे सनद फी आकारणी बाबतचे सविस्तर सूचना उपरोक्त वाचा सदरी नमुद क्र.३ या परिपत्रकाव्दारे देण्यात आले आहेत. तसेच भूमि अभिलेख विभागातील अधिकारी/कर्मचारी यांना गावठाण भूमापन प्रकल्प स्वामित्व योजना राबविताना करावयाची कार्यवाही बाबत सविस्तर सूचना उपरोक्त वाचा सदरी नमुद क्र.४ या परिपत्रकाव्दारे देण्यात आले आहेत.या परिपत्रकाद्वारे खालील सूचना देण्यात येत आहे.

१. वाचा सदरी नमुद क्र.४ या परिपत्रकामधील मुद्दा क्रमांक ४.२.५ "भारतीय प्रतिभुती मुद्रणालय नाशिक यांचेकडे सनदा डिजीटल साईन करून छपाईसाठी पाठविणे." या ऐवजी **"या प्रकल्पांतर्गत तयार झालेले सनदा संबंधित तालुक्याचे उप अधीक्षक भूमी अभिलेख यांनी डिजीटल साईन करून नियमाप्रमाणे कार्यपद्धती अनुसरून छपाई करून घावे."** असे वाचावे.

**२.सनद तपासणी कामी महत्वाचे मार्गदर्शक सूचना -**

१. सनद हि म.ज.म.अ.१९६६ मध्ये नमूद विहित नमुन्यातच तयार करावी
२. मिळकत धारक/धारकांचे नाव, तालुका, गावाचे नाव, शिट क्रमांक, चालता क्रमांक, नगर भूमापन क्रमांक,संबधित क्षेत्रफळ चौकशी नोंदवही ,मिळकत पत्रिका ,ब नोटीस तपशिल एकसारखाच असावा.
३. सनदमध्ये नमूद नकाशा हा संबधित नगर भूमापन क्रमांकाशी मेळात असावा.
४. सदर नकाशाचे चतु:सीमा हे अंतिम केलेल्या नकाशाशी मेळात असावे.
५. सनदमध्ये नकाशाचे प्रमाण बरोबर असल्याची खात्री करावी.
६. सनद मध्ये सत्ताप्रकारची माहिती बरोबर असल्याची खात्री करावी.
७. सनद मध्ये संबंधित तालुका उप अधीक्षक भूमी अभिलेख यांची डिजीटल साईन व कार्यालयाचा शिक्का नमूद असावा.

**३.सनद छपाईसाठीचे मार्गदर्शक सूचना-**

१. छपाईसाठी ८० GSM , A- 4 Size चा बॉड कागद वापरावा.
२. प्रत्येक सनद २ प्रतीमध्ये छापावी. (कार्यालयीन प्रत व नागरिकांना देण्यात येणारी प्रत.)
३. सनद प्राप्त झालेबाबत संबधित मिळकत धारकाची दिनांकित स्वाक्षरी प्रचलित नियमाप्रमाणे घ्यावी.
४. कार्यालयीन प्रत कार्यालयात कायमस्वरूपी अभिलेख म्हणून संधारण करण्यात यावे.
५. सनद छपाईसाठी होणारा खर्च विहित कार्यप्रणाली व वित्तीय नियमाचे पालन करून करावे.

स्वाक्षरी/-XXX
**(एन.के.सुधांशु)**
**जमाबंदी आयुक्त आणि संचालक**
**भूमी अभिलेख (म.रा.),पुणे**

प्रत:

१. अप्पर जमाबंदी आयुक्त आणि अतिरिक्त संचालक भूमी अभिलेख ,पुणे यांना माहितीस्तव
२. उप संचालक भूमी अभिलेख संलग्न जमाबंदी आयुक्त (भूमापन)(एकत्रीकरण)पुणे यांना माहितीस्तव
३. उप संचालक भूमी अभिलेख पुणे/मुंबई/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी
४. सर्व जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी
५. सर्व उप अधीक्षक भूमी अभिलेख / नगर भूमापन अधिकारी यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी
६. सर्व उप अधीक्षक भूमी अभिलेख तथा चौकशी अधिकारी यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी

**निर्गमित**

**(बाळासाहेब काळे)**
**उप संचालक भूमी अभिलेख संलग्न**
**जमाबंदी आयुक्त (ना.भू.)पुणे**